**मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०१७ रोजी मंडळाच्या मुख्यालयात,म.औ.वि.महामंडळ औद्योगिक क्षेत्र तारापूर अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत.**

---------------

मा.सदस्य सचिव,म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४/०६/२०१७ रोजी मंडळाच्या मुख्यालयात,म.औ.वि.महामंडळ औद्योगिक क्षेत्र तारापूर अतिप्रदूषित क्षेत्रातील प्रदूषण निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा अंमलबजावणीबाबत आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकारी व उद्योगांचे प्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

आढावा बैठकीच्या प्रस्तावनेबाबत नमूद करताना सह-संचालक(हप्रनि) यांनी मंडळाने निर्देशांक कमी करण्याच्या दृष्टीने कृती आराखडयामध्ये अल्प व दीर्घ मुदतीत प्रदूषण निर्देशांक कमी करण्याबाबतच्या उपाययोजनांचा समावेश आहे व संबंधित उपाययोजनेबाबत प्रभावी अंमलबजावणीची सद्य:स्थितीबाबत आढावा बैठक घेण्यात येत आहे. तसेच सह-संचालक(हप्रनि) यांनी कृती आराखडयाबाबतचा अहवाल विस्तृतपणे सादर करण्यात आला.

सदर निर्देशांक कमी करण्यासाठी म.प्र.नि.मंडळाने तयार केलेल्या कृती आराखडयाचा पाठपुरावा करुन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुचविलेल्या हवा,जल व भूमीमध्ये झालेल्या प्रदूषणाची तीव्रता कमी करण्यासाठी उद्योगाकडून वेळोवेळी भेटी देऊन, दोषी आढळलेल्या उद्योगांना नोटीसा बजावून तसेच त्यांच्याकडून हवा व जल प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारण्यास भाग पाडणे अशी कार्यवाही करण्यात आली व सदर उपाययोजनेबाबत पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

मागील आढावा बैठकीच्या इतिवृत्तानुसार मा.सदस्य सचिव यांनी संबंधित विभागाशी विचारणा करुन बैठकीत उपस्थित झालेल्या मुद्दानुसार केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला.

बैठकीस उपस्थित असलेल्या म.औ.वि.महामंडळ, टीईपीस-सीईटीपी,टीमा औद्योगिक संघटनेचे प्रतिनिधी यांना तारापूर औद्योगिक क्षेत्रातून निर्माण होणा-या जल , हवा व घातक घनकचरा याबाबतची प्रक्रिया व विल्हेवाट संबंधिची सद्य:स्थिती तसेच प्रस्तावित कामासंदर्भात विचारणा केली.

...२/-

मा.सदस्य सचिव यांनी पूणे येथील मा.राष्ट्रीय हरित लवाद न्यायालयातील याचिका क्र.६४/२०१६ च्या अन्वये, ४०टक्के पाणीपुरवठा कमी करणे, तसेच औद्योगिक सांडपाणी २५ दशलक्ष घनमिटरपेक्षा जास्त निर्माण होऊ नये इत्यादीबाबतच्या आदेशाचे पालन करणे सर्वांना बंधनकारक आहे, असे सांगितले. म.प्र.नि.मंडळाने २०१७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार प्रदूषण निर्देशांक ६७.६७ एवढा असून तो निर्देशांक ७० वर गेल्यास तारापूर औद्योगिक क्षेत्रावर पुन्हा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून पुन्हा बंदी आदेश (Morotorium) लागण्याची शक्यता असल्याने, सर्व संबंधित घटकांना आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच सर्व घटकांनी तारापूर कृती आराखडयाप्रमाणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे व जेणे करुन सदर निर्देशांक कमी करता येईल. सदर बैठकीचा कार्यपालन अहवाल संबंधित घटकांनी,पुढच्या बैठकीच्या वेळेस पुर्तता करुन सादर करावे, असे निर्देश दिले.

तारापूर औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष व टीपीएस-सीईटीपीचे संचालक श्री. डी. के. राऊत यांनी, तारापूर औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यातून निर्माण होणा-या High COD Stream वेगळी करुन त्यावर स्वतंत्रपणे प्रक्रिया करु, यासाठी आम्हाला म.औ.वि.महामंडळाने परवानगी दयावी, अशी विनंती केली. तसेच सम्प क्रमांक ३ मध्ये Floating Aerators बसविण्यासाठी म.औ.वि.महामंडळाने परवानगी दयावी, अशी विनंती केली. त्यावर म.औ.वि.महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. कलकुटकी यांनी उपरोक्तसाठी आमची संमती आहे, असा होकार दर्शविला. तद्नंतर मा.सदस्य सचिव यांनी टीपीएस-सीईटीपीला पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले व High COD Stream वेगळी करुन त्यावर स्वतंत्रपणे प्रक्रिया करावी व Spray Dryer सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा, असे निर्देश टीपीएस-सीईटीपी या संघटनेस दिले. तसेच सद्य:स्थितीतील २५ दशलक्ष घनमिटर क्षमतेच्या सीईटीपीच्या देखभाल व दुरुस्ती (O & M) मध्ये सुधारणा करुन सीईटीपीतून बाहेर पडणा-या प्रक्रियाकृत सांडपाण्याच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा होईल व प्रदूषित घटकांचे प्रमाण विहित मर्यादेत येतील असे पाहावे, अशा स्वरुपाचे निर्देश बजाविले.

मा.सदस्य सचिव यांनी म.औ.वि.महामंडळाच्या अधिका-याने जुनी ड्रेनेज पाईपलाईन बदलण्याच्या कामाच्या प्रगतीबाबत विचारणा केली. त्यावर म.औ.वि.महामंडळ कार्यकारी अभियंता श्री. कलकुटकी यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे माहिती दिली. तारापूर औद्योगिक क्षेत्रात एकूण ५८ किलोमीटर लांबीची सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन आरसीसीची होती. सदर पाईपलाईन एचडीपीचे साहित्य वापरुन बदलण्याचे काम टप्प्या-टप्प्याने सुरु आहे. आजपर्यंत २२.३३ किलोमिटर लांबीची पाईपलाईन बदलण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच सम्प क्रमांक २

...३/-

पासून ते नवापूर समुद्रापर्यंतची ३.३६ किलोमीटर लांबीची एक मीटर व्यासाची पाईपलाईन एचडीपीईची टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित १८.९७ किलोमीटर लांबीची पाईपलाईन बदलण्याची वर्कऑर्डर मे-२०१७ मध्ये एजन्सीला देण्यात आलेली आहे. सदर एजन्सीला उपरोक्त कामासाठी निविदेनुसार १८ महिन्यांच्या कालावधी देण्यात आला आहे. तो कालावधी नोव्हेबर-२०१८ पर्यंत आहे. सदर कालावधी मर्यादेपूर्वीच काम पूर्ण करण्याचा म.औ.वि.महामंडळाचा मानस आहे. तसेच म.औ.वि.महामंडळ कार्यकारी अभियंता श्री. कलकुटकी यांनी तारापूर औद्योगिक क्षेत्रातील ३४ किलोमिटर लांबीच्या पावसाळी गटार (Storm Water Drain) चे काम पुढील एक वर्षात पूर्ण करण्याचा मानस आहे, असे सांगितले. त्यावर मा.सदस्य सचिव यांनी उपरोक्त बाबत म.औ.वि.महामंडळाने लवकरात-लवकर कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. तसेच म.औ.वि.महामंडळ कार्यकारी अभियंता श्री.कलकुटकी यांनी नवापूर समुद्रात टाकण्यात येणा-या ७.१ किलोमीटर लांबीच्या पाईपलाईनचे काम, पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांची परवानगी (CRZ Clearance) न मिळाल्याने सदर काम रखडले आहे. म्हणून म.प्र.नि.मंडळाने सद्य:स्थिती अहवाल पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांना देण्याची विनंती केली. त्यावर मा.सदस्य सचिव यांनी उपरोक्त बाबत प्रधान वैज्ञानिक अधिकारी व प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ ठाणे यांना सदर अहवाल तयार करुन तो पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांना लवकरात-लवकर सादर करावा, असे निर्देश दिले.

सह-संचालक(हप्रनि) यांनी सर्व उद्योगांनी कोळश्याऐवजी सीएनजी गॅसचा वापर सुरु करावा, असे आदेश मंडळाने यापूर्वीच दिले आहेत. याबाबतच्या प्रगतीबाबतची विचारणा केली. त्यावर तारापूर औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष व टीपीएस-सीईटीपीचे संचालक श्री. डी. के. राऊत यांनी, तारापूर औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांसाठी मे.गेल इंडिया लि. व मे. गुजरात गॅस लि. या सरकारी कंपन्यामार्फत पुरविल्या जाणा-या सीएनजी गॅसचा प्रस्तावित दर खूपच जास्त आहे. उद्योगांना कोळशा किंवा फर्नेस ऑईलसारखे पारंपारिक इंधन वापरणे कमी खर्चीक होते, असे सांगितले व सदर दर कमी करण्याबाबत विनंती केली. मे.गेल इंडिया लि. सरकारी कंपन्यांच्या प्रतिनिधी आम्हाला भारत सरकारच्या पेट्रोलियम व नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्डच्या मार्गदर्शक तत्वानुसार ५०,००० स्टॅन्डर्ड मिटर क्युब प्रतिदिन पेक्षा जास्त गॅसचा पुरवठा उद्योगांना करण्याचे निर्देश आहेत, असे सांगितले. तसेच मे. गुजरात गॅस लि. या सरकारी कंपनीस ५०,००० स्टॅन्डर्ड मिटर क्युब प्रतिदिन पेक्षा कमी गॅसचा पुरवठा उद्योगांना करण्याचे निर्देश आहेत, असे सांगितले व ठाणे जिल्हयाचा ग्रामीण भाग व पालघर जिल्हयाला गॅस पुरवठा करण्याचे आम्हाला पेट्रोलियम व नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्डाचे निर्देश आहेत, असे सांगितले व त्यानुसार आम्ही तारापूर औद्योगिक क्षेत्रात पाईपलाईन टाकण्याच्या कामात लवकरच सुरुवात करणार आहोत. औद्योगिक क्षेत्रातील E, N, T, क्षेत्रातील ४२ किलोमिटर

लांबीच्या पाईपलाईन टाकण्यासाठी म.औ.वि.महामंडळाने दिनांक २/०३/२०१७ रोजी परवानगी दिली आहे. व ४,००० स्के.मिटर क्षेत्राचा भूखंड क्रमांक J-247/5 दिला आहे. सदर भूखंडावर गॅस पुरवठा करण्याची पाईपलाईन व मशिनरी आणून ठेवण्यात आली आहे व पावसाळयानंतर त्वरील काम सुरु करण्यात येईल.

तारापूर औद्योगिक परिसरात वर्ष २०१७ मध्ये २.५ लाख वृक्ष लागवड करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. बैठकीदरम्यान म.औ.वि.महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सुचविले की, सर्व उद्योगांनी त्यांच्या कारखाना व रस्ता यामधील मोकळया जागेत वृक्ष लागवड करावी. तद्नंतर याबाबत मा.सदस्य सचिव यांनी २.५ लाख वृक्ष लागवड सर्व संबंधित घटकांनी करावे असे निर्देश दिले.

याबाबत मा.सदस्य सचिव यांनी मे.गेल इंडिया लि. व मे. गुजरात गॅस लि. या सरकारी कंपन्यांना उपरोक्त बाबत आपले तांत्रिक प्रस्ताव व दर कमी करणे शक्य असल्यास, तसा प्रस्ताव म.प्र.नि.मंडळास सादर करावा व याबाबत म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयात येऊन सादरीकरण करण्यात यावे, अशा सूचना केल्या.

मा.सदस्य सचिव यांनी निर्देशांक कमी करण्यासाठी निगडित असलेल्या विभागांची कृती आराखडयाबाबतच्या उपाययोजनेंची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी व उपस्थित झालेल्या मुद्दांबाबत कार्यवाहीबाबतचाी तपशील स्वतंत्रपणे जोडला आहे.

बैठकीस उपस्थितांचे आभार मानून आढावा बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**सह संचालक(हप्रनि)**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

**सदस्य सचिव**
म.प्र.नि.मंडळ, मुंबई

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयात दि.१४.०६.२०१७ च्या सीईपीआयच्या बैठकीदरम्यान उपस्थित मुद्दयांच्या कार्यपालन अहवालाबाबत....

| अ. क्र. | उपस्थित मुद्दे | जबाबदार संस्था | कालावधी | सद्य:स्थिती | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | नविन ५० एमएलडी सीईटीपी उभारणे व कार्यान्वित करणे | टीईपीएस सीईटीपी व टीमा | ०१ डिसेंबर, २०१७ पुर्वी | वर्ष २०१७ च्या पावसाळयाच्या काळात पावसामुळे कामाची गती मंद आहे. तसेच बँक लोन उशिरा मिळाल्यामुळे वेळेत काम पूर्ण होऊ शकले नाही. सद्य:स्थितीत अदमाशे ८० टक्के सिव्हील वर्क पूर्ण झाले आहे. | सदर प्रकल्प टीईपीएस सीईटीपी व टीमा या संस्थांनी ०१ डिसेंबर, २०१७ पुर्वी पूर्ण करावा. |
| २ | २५ एमएलडीच्या सीईटीपीमध्ये सुधारणा करणे | टीईपीएस सीईटीपी व टीमा | २ महिने | सुधारणा करण्याचे काम सुरु आहे. (२५ एमएलडी सामायिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेची देखभाल व दुरुस्तीच्या कामात हवी तशी प्रगती झालेली नाही.) | टीईपीएस सीईटीपी व टीमा यांनी २५ एमएलडीच्या सीईटीपीमध्ये २ महिन्यामध्ये सुधारणा करावी. |
| ३ | ड्रेनेज पाईपलाईनची गळती थांबविणे, तसेच चेंबर ओव्हरफ्लो होणे, इ.समस्या | म.औ.वि.महामंडळ | नियमितपणे | सद्य:स्थितीत ओव्हरफ्लोचे प्रमाण कमी झाले आहे. परंतु ड्रेनेज पाईपलाईनमधुन गळती , चेंबर चोक अप होणे, इ.घटना अधुनमधून होत असल्याने, जल प्रदुषणची समस्या कमी झालेली नाही. | म.औ.वि.महामंडळाने सदर काम नियमितपणे करावे. |
| ४ | तारापूर औद्योगिक क्षेत्रात ३४ कि.मी.लांबीचे स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधणे, | म.औ.वि.महामंडळ | १ वर्ष | म.औ.वि.महामंडळाने काही ठिकाणी तारापूर औद्योगिक क्षेत्रात स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधण्याच्या निविदा काढण्याच्या कामास सुरुवात केली आहे. | म.औ.वि.महामंडळाने तारापूर औद्योगिक क्षेत्रात ३४ कि.मी.लांबीचे स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधण्याचे काम १ वर्षामध्ये पूर्ण करावे. |
| ५ | तारापूर औद्योगिक क्षेत्रात उर्वरित १८.९७ कि.मी. आरसीसी पाईप लाईन बदलुन एचडीपीईची टाकणे | म.औ.वि.महामंडळ | १८ महिने | आजपर्यंत २२.३३ किलोमिटर लांबीची पाईपलाईन बदलण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित १८.९७ किलोमीटर लांबीची पाईपलाईन बदलण्याची वर्कऑर्डर मे-२०१७ मध्ये एजन्सीला देण्यात आलेली आहे. सदर एजन्सीला उपरोक्त कामासाठी निविदेनुसार १८ महिन्यांच्या कालावधी देण्यात आला आहे. तो कालावधी नोव्हेंबर-२०१८ पर्यंत आहे. | म.औ.वि.महामंडळाने तारापूर औद्योगिक क्षेत्रात उर्वरित १८.९७ किलोमीटर लांबीची पाईपलाईन बदलण्याची काम १८ महिने मध्ये पूर्ण करावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | सम्प क्रमांक २ पासून ते नवापूर समुद्रापर्यंतची ३.३६ किलोमीटर लांबीची एक मीटर व्यासाची पाईपलाईन एचडीपीईची टाकणे | म.औ.वि.महामंडळ | ०६ महिने | सम्प क्रमांक २ पासून ते नवापूर समुद्रापर्यंतची ३.३६ किलोमीटर लांबीची एक मीटर व्यासाची पाईपलाईन एचडीपीईची टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे | म.औ.वि.महामंडळाने सम्प क्रमांक २ पासून ते नवापूर समुद्रापर्यंतची ३.३६ किलोमीटर लांबीची एक मीटर व्यासाची पाईपलाईन एचडीपीईची टाकण्याचे काम ०६ महिने मध्ये पूर्ण करावे. |
| ७ | समुद्र विज्ञान संस्थेने निर्देशित केल्याप्रमाणे, ७.१ कि.मी. पाईपलाईन खोल समुद्रात टाकणे | म.औ.वि.महामंडळ | ३ वर्षे किंवा पर्यावरणीय अनुमतीनुसार दिलेला कालावधी यापैकी जो कमी असेल असा कालावधी | वर्ष २०१८ पर्यंत सदरचे काम पूर्ण करणे प्रस्तावित आहे. (मे.एसएमसी – आयव्हीआरसीएलव्हीयो (जेव्ही) या कंपनीस समुद्र विज्ञान संस्थेने निर्देशित केल्याप्रमाणे ७.१ कि.मी. पाईपलाईन खोल समुद्रात टाकण्याचे काम वर्क ऑर्डर क्र. टीसी/ आयएफएमएस/ बी-५६३१८/ २०१७, दि.२६.०५.२०१५ अन्वये देण्यात आलेले आहे. निविदेनुसार काम पूर्ण करावयाचा कालावधी ३ वर्षे म्हणजेच २६.०५.२०१८ पर्यंत आहे. सद्य:स्थितीत कंत्राटटाराने समुद्रात टाकण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या पाईपच्या प्रोक्युरमेंटचे काम पूर्ण झाले आहे. तथापि या कामास पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची सीआरझेड नियमानुसार मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे सदर ७.१ कि.मी.पाईप लाईनचे काम बंद आहे. | म.औ.वि.महामंडळाने सदर काम निविदेनुसार काम पूर्ण करावयाचा कालावधीच्या आंत म्हणजेच २६.०५.२०१८ पुर्वी पूर्ण करावे. सदर काम पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांची परवानगी (CRZ Clearance) न मिळाल्याने सदर काम रखडले आहे. म्हणून म.प्र.नि.मंडळाने सद्य:स्थिती अहवाल पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांना देण्याची विनंती म.औ.वि.महामंडळाने केली. त्यावर मा.सदस्य सचिव यांनी उपरोक्त बाबत प्रधान वैज्ञानिक अधिकारी व प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ ठाणे यांना सदर अहवाल तयार करुन तो पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांना लवकरात-लवकर सादर करावा, असे निर्देश दिले. |
| ८ | तारापूर औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यातून निर्माण होणा-या High COD | टीईपीएस सीईटीपी व टीमा | ०३ महिने | High COD Stream वेगळी करुन त्यावर स्वतंत्रपणे प्रक्रिया करावी, सम्प क्रमांक ३ मध्ये Floating Aerators बसविणे. व Spray Dryer सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा, तसेच सद्य:स्थितीतील २५ | टीईपीएस सीईटीपी व टीमा यांनी सदर काम ०६ महिन्यात पूर्ण करावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Stream वेगळी करुन त्यावर स्वतंत्रपणे प्रक्रिया करणे | | | दशलक्ष घनमिटर क्षमतेच्या सीईटीपीच्या देखभाल व दुरुस्ती (O & M) मध्ये सुधारणा करुन सीईटीपीतून बाहेर पडणा-या प्रक्रियाकृत सांडपाण्याच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा होईल व प्रदूषित घटकांचे प्रमाण विहित मर्यादेत येतील असे पाहावे, अशा स्वरुपाचे निर्देश म.प्र.नि.मंडळ बजाविले आहे. | |
| ९ | तारापूर औद्योगिक क्षेत्र सीईपीआयच्या कक्षेत येत असल्याने पुढील तीन महिन्याच्या कालावधीत मोठया व मध्यम स्वरुपाच्या कारखान्यांनी कोळसा ऐवजी सीएनजी गॅसचा वापर करणे, सदरबाबत मे.गेल इंडिया, मे.टिमा व मोठया व मध्यम उद्योगाने याबाबत अहवाल सादर करणे | मे.गेल इंडिया लि., मे.टीमा, मोठया व मध्यम स्वरुपाचे कारखाने | ०६ महिने | मे.गेल इंडिया लि. सरकारी कंपनीस भारत सरकारच्या पेट्रोलियम व नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्डच्या मार्गदर्शक तत्वानुसार ५०,००० स्टॅन्डर्ड मिटर क्युब प्रतिदिन पेक्षा जास्त गॅसचा पुरवठा उद्योगांना करण्याचे निर्देश आहेत. तारापूर औद्योगिक क्षेत्रात ५०,००० स्टॅन्डर्ड मिटर क्युब प्रतिदिन पेक्षा जास्त गॅसचा वापर करणाऱ्या फक्त ०५ उद्योग आहेत. प्रत्यक्ष गॅसचा पुरवठा नुकताच दि.२३.०९.२०१५ रोजी पासुन मे.गेल इंडिया लि. तर्फे तारापुर औद्योगिक क्षेत्रात पाच कारखान्यासाठी सुरु करण्यात आला आहे. इतर मोठया व मध्यम उद्योगांना सुध्दा मे.गेल इंडिया मार्फत गॅसचा पुरवठा होऊ शकतो किंवा कसे, याबाबत मे.गेल इंडिया यांनी संबंधित प्राधिकरणाची परवानगी प्राप्त करुन करुन घ्यावी. इतर उद्योगांकडे म.प्र.सिन.मंडळामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. (मोठया स्वरुपाच्या २७ व मध्यम स्वरुपाच्या ०९ उद्योगांना कोळसा ऐवजी सीएनजी गॅसचा वापर करण्यासाठी दि.११.०९.२०११५ रोजी हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम ३१ अनवये निर्देश बजावण्यात आले आहेत.) तसेच लहान स्वरुपाच्या २१ उद्योगांना कोळसा ऐवजी सीएनजी गॅसचा वापर करण्यासाठी दि.१.०९.२०१५ रोजी हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कालम ३१ अनवये निर्देश | सदर काम संबंधित उद्योगांनी ०६ महिन्यात पूर्ण करावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | बजावण्यात आले आहेत. एकूण ५७ उद्योगांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. | |
| १० | तद्नंतर पुढील कालावधीत सर्वच उद्योगांनी कोळसा ऐवजी सीएनजी गॅसचा वापर करावा | मे.गेल इंडिया लि., मे.टीमा, लघु सवरुपाचे कारखाने | १ वर्षे | याबाबत सर्व लघु उद्योगांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. (लघु स्वरुपाच्या २१ उद्योगांना कोळसा ऐवजी सीएनजी गॅसचा वापर करण्यासाठी दि.११.०९.२०१५ रोजी हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम ३१ अन्वये निर्देश बजावण्यात आले आहेत.) | सदर काम संबंधित उद्योगांनी एक वर्षात पूर्ण करावे. |
| ११ | मे. गुजरात गॅस लि. यांनी औद्योगिक क्षेत्रातील E, N, T, क्षेत्रातील ४२ किलोमिटर लांबीच्या पाईपलाईन टाकणे | मे. गुजरात गॅस लि. व मे.टीमा | ०१ डिसेंबर, २०१७ पुर्वी | टप्पा क्र.१ : औद्योगिक क्षेत्रातील E, N, T, क्षेत्रातील ४२ किलोमिटर लांबीच्या पाईपलाईन टाकण्यासाठी म.औ.वि.महामंडळाने दिनांक २/०३/२०१७ रोजी परवानगी दिली आहे. व ४,००० स्के.मिटर क्षेत्राचा भूखंड क्रमांक J-247/5 दिला आहे. सदर भूखंडावर गॅस पुरवठा करण्याची पाईपलाईन व मशिनरी आणून ठेवण्यात आली आहे व पावसाळयानंतर त्वरील काम सुरु करण्यात येईल. गॅसचा दर कमी करण्याबाबत उद्योगांच्या टीमा या संघटनेने विनंती केली. असे सांगितले. मे. गुजरात गॅस लि. या गुजरात सरकारच्या कंपनीस ठाणे जिल्हयाचा ग्रामीण भाग व पालघर जिल्हयाला गॅस पुरवठा करण्याचे पेट्रोलियम व नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्डाचे निर्देश आहेत, व त्यानुसार आम्ही तारापूर औद्योगिक क्षेत्रात पाईपलाईन टाकण्याच्या कामात लवकरच सुरुवात होणार आहे. | याबाबत मा.सदस्य सचिव यांनी मे.गेल इंडिया लि. व मे. गुजरात गॅस लि. या सरकारी कंपन्यांना उपरोक्त बाबत आपले तांत्रिक प्रस्ताव व दर कमी करणे शक्य असल्यास, तसा प्रस्ताव म.प्र.नि.मंडळास सादर करावा व याबाबत म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयात येऊन सादरीकरण करण्यात यावे, अशा सूचना केल्या. |
| १२ | मे. गुजरात गॅस लि. यांनी औद्योगिक क्षेत्रातील E, N, T, वगळून इतर क्षेत्रातील २६ किलोमिटर लांबीच्या पाईपलाईन टाकणे | मे. गुजरात गॅस लि. व मे.टीमा | ३१ मार्च, २०१८ पुर्वी | टप्पा क्र.२ : तारापूर औद्योगिक क्षेत्रातील मे.गुजरात गॅस लि. यांनी औद्योगिक क्षेत्रातील E, N, T, वगळून इतर क्षेत्रातील २६ किलोमिटर लांबीच्या पाईपलाईन टाकणे | टप्पा क्र.२ नुसार, तारापूर औद्योगिक क्षेत्रातील . गुजरात गॅस लि. यांनी औद्योगिक क्षेत्रातील E, N, T, वगळून इतर क्षेत्रातील २६ किलोमिटर लांबीच्या पाईपलाईन टाकण्याचे काम ३१ मार्च, २०१८ पुर्वी पूर्ण करणे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | स्वयंललित हवा गुणवत्ता तपासणी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रणालीनुसार उभारणे | म.प्र.नि.मंडळ | ०१ वर्ष | स्वयंचलित हवा गुणवत्ता तपासणी केंद्र एकूण तीन ठिकाणी उभारले आहेत. १. मे.जे.एस.डब्ल्यु.पॉवर प्लांट, २. जे.एस.डब्ल्यु रेसीडेन्सी कॉलनी, ३. म.प्र.नि.मंडळ, कार्यालय तारापूर. | स्वयंचलित हवा गुणवत्ता तपासणी केंद्र एकूण तीन ठिकाणी उभारले आहेत. १. मे.जे.एस.डब्ल्यु.पॉवर प्लांट, २. जे.एस.डब्ल्यु रेसीडेन्सी कॉलनी, ३. म.प्र.नि.मंडळ, कार्यालय तारापूर. |
| १४ | तारापूर औद्योगिक परिसरात वर्ष २०१७ मध्ये २.५ लाख वृक्ष लागवड करणे | म.प्र.नि.मंडळ, म.औ.वि.महामंडळ टीईपीएस सीईटीपी व टीमा, | ०३ महिने | २.५ लाख वृक्ष लागवड सर्व संबंधित घटकांनी करावे. बैठकीदरम्यान म.औ.वि.महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सुचविले की, सर्व उद्योगांनी त्यांच्या कारखाना व रस्ता यामधील मोकळया जागेत वृक्ष लागवड करावी. | २.५ लाख वृक्ष लागवड सर्व संबंधित घटकांनी ०३ महिन्याच्या कालावधीत करावी. सर्व उद्योगांनी त्यांच्या कारखाना व रस्ता यामधील मोकळया जागेत वृक्ष लागवड करावी. |

-xxxx-